**PARLE MAHOTSAV**
Organiser - **ADV. PARAG ALAVANI,** MLA, President - Vile Parle Cultural Centre
2, Amber Palace, Chittaranjan Road, Vile Parle (East), Mumbai 400 057.
Tel.: 26136513, 26177125 • Website : www.parlemahotsav.com

PARLE MAHOTSAV

# कृपया प्रसिद्धीसाठी

**२० व्या पार्ले महोत्सवास स्पर्धकांचा उत्स्फूर्त सहभाग**
**मुंबईच्या कानाकोपऱ्यातून तसेच राज्याबाहेरुन सुद्धा हजेरी**

मुंबई दि. २४ : २० व्या पार्ले महोत्सवास दरवर्षी प्रमाणे उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला असून पहिल्या चार दिवसांत सुमारे सात हजार स्पर्धकांसह प्रेक्षकही मोठ्या संख्येने उपस्थित असून अंदाजे दहा ते बारा हजार लोकांनी आपली उपस्थिती दर्शवली आहे. आता पर्यंत कबड्डी, व्हॉली बॉल, ओव्हर आर्म व बॉक्स क्रिकेट तथा गायन अशा पाच स्पर्धा सुरू झाल्या असून पुढील काळात होणाऱ्या स्पर्धांना असाच उत्स्फूर्त प्रतिसाद लाभत आहे.

पार्ले महोत्सवात होणाऱ्या व्हॉली बॉल स्पर्धेमध्ये मुंबई व महाराष्ट्राबाहेरील स्पर्धक येण्याच्या असलेल्या परंपरेनुसार काल चेन्नईचा 'चेन्नई स्पायकर्स' हा मुलींचा संघ स्पर्धेत सहभागी झाला. तसेच भारतीय महिला संघाचे प्रशिक्षक विरल शाह हे ही यावेळी उपस्थित होते.

याच प्रमाणे कबड्डी स्पर्धेमध्ये नवीन व होतकरू खेळाडूंना संधी मिळण्यासाठी प्रमुख्याने पार्ले महोत्सवात 'ब' गटाचे सामने खेळविले जातात. तसेच महिला गटातील स्पर्धेमध्ये कनिष्ठ श्रेणीतील राष्ट्रीय खेळाडूंचाही सहभाग होता.

तर गायन स्पर्धेत ९ वर्षाच्या स्पर्धकांपासून ८० वर्षाचे जेष्ठ नागरिकही सहभागी झाले. या स्पर्धेचे उद्घाटन सुप्रसिद्ध संगीत संयोजक श्री. विकास भाटवडेकर यांच्या शुभ हस्ते करण्यात आले. तसेच 'कराओके गायन' स्पर्धेत गेल्या वर्षी पेक्षा २५ टक्क्यांहून अधिक स्पर्धकांनी सहभाग घेतला